इयत्ता: बारावी | विषय: राज्यशास्त्र

बोर्ड परीक्षा: जुलै 2024 | गुण: 80 गुण

---

**प्रश्न १. (अ) कंसांतील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** **(०५)**

(१) माहितीच्या युगातील तंत्रज्ञान हे साधारणतः स्वरूपाचे असते.

(आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, स्थानिक, प्रादेशिक)

(२) भारतात महिलांच्या समस्यांकडे पाहण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन ___ हा आहे.

(कल्याणकारी, विकासात्मक, सक्षमीकरण, शैक्षणिक)

(३) पहिली राष्ट्रीय एकात्मता परिषद ____ साली घेण्यात आली.

(१९६१, १९६०, १९६५, १९९०) (मार्च '२४)

(४) माहितीचा अधिकार हा ____ एक महत्त्वाचा पैलू आहे.

(सुशासनाचा, लोकशाहीचा, विकेंद्रीकरणाचा, विकासाचा)

(५) ____हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

(वसाहतवाद, अलिप्ततावाद, साम्यवाद, प्रादेशिकवाद)

प्र. १ (ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा : (३)

(१) (अ) व्लादिमीर पुतिन - दक्षिण सुदान

(ब) जॉर्ज डब्ल्यू बुश- दहशतवादविरोधी लढाई

(क) पूर्व तिमोर - इंडोनेशिया

(२) (अ) ब्रंटलँड कमिशन - शाश्वत विकास

(ब) हवामान बदल - हरितगृह वायूंचे उत्सर्जन

(क) नियोजन आयोग - निर्वाचन आयोग

(३) (अ) बोकोहराम - बांग्लादेश

(ब) अफगाण - तालिबान अफगाणिस्तान

(क) जैश-ए-मोहम्मद - पाकिस्तान.

**प्र.१ ला (क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय/कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)**

(१) कॅटलोनियाला __ या देशापासून स्वातंत्र्य हवे आहे -

(अ) इंडोनेशिया

(ब) सर्बिया

(क) स्पेन

(२) १९७२ साली संयुक्त राष्ट्रांची मानवी पर्यावरणविषयक परिषद ___ येथे झाली

(अ) रिओ-दी-जेनेरिओ

(ब) पॅरिस

(क) स्टॉकहोम

(३) जहालवादी डावे गट पायाभूत विकास कामांमध्ये अडथळे निर्माण करतात; कारण___

(अ) ते शासनाच्या धोरणाला सहकार्य करतात.

(ब) विरोधी पक्ष त्यांना असे करण्यास सांगतात.

(क) शासनाच्या योजना या भागात कुचकामी ठरतात असा त्यांना प्रचार करायचा असतो.

(४) लोकपाल ही संकल्पना या देशाकडून घेण्यात आली

(अ) फिनलँड

(ब) स्वीडन

(क) नॉर्वे

**प्र.१ (ड) - दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा: (४)**

(१) आपल्या अवतीभोवती असणारे वातावरण

(२) या क्रांतीमुळे कृषी उत्पादनात वाढ होऊन भारत अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला -

(३) लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग - (मार्च २३ - २५)

(४) प्रशासनात माहिती आणि संपर्क तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती -

प्र.१ (इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा : (४)


(१) बांग्लादेश, भूतान, श्रीलंका, पोलंड.

(२) कॉपीराईट, टेलिफोन, ट्रेडमार्क, पेटंट. (मार्च '२३)


(३) आर्थिक समता, शोषण, तस्करी, निरक्षरता.

(४) पारदर्शकता, भ्रष्टाचार, उत्तरदायित्व, प्रतिसादात्मक

प्र. 2 अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा(जुलै '२३) (४)



प्र. 2 (ब ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून त्यापुढील प्रश्नांची उत्तरे लिहा (५)




(१) दोन महासागरांची नावे लिहा. (२)

(२) भारताच्या शेजारील तीन राष्ट्रांची नावे लिहा. (3)

**प्र. 3 ) पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा : (कोणतीही पाच)** (१०)

(१) मास्त्रीक्त करार युरोपच्या संरक्षणासाठी करण्यात आला.

(२) सक्षमीकरणामुळे दुर्बल घटकांचा विकास होतो.

(३) भारतीय स्वातंत्र्य चळवळ राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरली.

(४) ग्राहकांच्या हिताचे संरक्षण ग्राहक न्यायालय करते.

(५) LTTE ही बांग्लादेशातील तमिळ लोकांच्या हक्कासाठी लढत होती.

(६) राष्ट्रीय महिला आयोगाची निर्मिती महिलांच्या तक्रारी निवारण करण्यासाठी करण्यात आली.

(सप्टें. '२१; मार्च २२ २३ जुलै '२३)

(७) 'सागरमाला' या योजनेत रस्त्याचा व्यापक विकास अभिप्रेत आहे. (मार्च २२; जुलै '२३)

**प्रश्न 4 पुढील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा: (कोणतेही तीन)** **(९)**

(१) जागतिकीकरण आणि संस्कृती. (प्रकरण २) (मार्च २२-२४- '२५)

(२) गरिबी आणि विकास. (प्रकरण ३) (मार्च २५)

(३) राष्ट्रीय एकात्मता आणि प्रादेशिक अस्मिता.

(सप्टें. '२१; मार्च '२२- '२३; जुलै '२२-२४)

(४) सुशासन आणि ई-प्रशासन.

(मार्च '२३- '२४; जुलै '२२-'२३- '२४)

(५) भारत आणि अलिप्ततावाद.(जुलै २२-२४; मार्च '२५)

प्र**. ५ वा - पुढील विषयांवर तुमचे मत २५ ते ३० शब्दांत मांडा (कोणतेही तीन)** **(१२)**

(१) हिंदी महासागरात भारताची भूमिका.

(२) भारतातील प्रशासकीय सुधारणांबाबत तुमचे मत नोंदवा.

(५) प्रशासकीय कार्यक्षमता वाढण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

(३) शांतता, स्थैर्य यांची राष्ट्राच्या प्रगतीसाठी गरज असते.

(मार्च २२ '२३; जुलै '२२)

(४) 'पर्यावरण संरक्षणाची गरज' यावर तुमचे मत लिहा.

(मार्च '२५; जुलै '२२)

(५) जागतिकीकरणामुळे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत झालेले बदल. (सप्टें. '२१)

**प्र. 6 -  पुढील प्रश्नांची उत्तरे ८० ते १०० शब्दांत लिहा : (कोणतेही दोन)** **(१०)**

(१) भारतातील महिलांची स्थिती स्पष्ट करा. (मार्च २५)

(२) जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद स्पष्ट करा. (मार्च '२५)

(३) विविध घटकांचे हक्क सुरक्षित करणाऱ्या भारतातील कोणत्याही पाच विविध संस्था/आयोग स्पष्ट करा.

(४) भारत-चीन संबंधांवर थोडक्यात चर्चा करा.

**प्र. 7 पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्‍द्यांच्या आधारे १५० ते २०० शब्दांत लिहा (१० गुण)**

(१) शीतयुद्धोत्तर काळातील पुढील प्रादेशिक संघटना स्पष्ट करा :

[ मुद्दे : (१) शांघाय सहकार्य संघटना (SCO) (२) सार्क (SAARC) (३) बीम्सटेक ( BIMSTEC) (४) ब्रिक्स (BRICS) (५) जी २० (G-20)]

(२) जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे सर्वसामान्य माणसावर झालेले परिणाम :

[ मुद्दे : (१) जागतिकीकरणाचा अर्थ (२) बहुराष्ट्रीय कंपनीचा अर्थ (३) श्रमिक बाजारावरील झालेले परिणाम (४) लहान उद्‍योगावर झालेले परिणाम (५) शेती क्षेत्रावर झालेले परिणाम ]